# ऋणनिर्देश

कोणताही अभ्यासविषय निवडताना आवड ही महत्त्वाची असते. मी ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी असल्यामुळे मला ग्रामीण विकासाची आस आहे. त्या अनुषंगानेच मी खेडयांचा सर्वांगीण विकास साधणाऱ्या व्यक्तीवर एम.फिल. करण्याचा निश्चिय केला, त्यामुळे 'डॉ.पतंगराव कदम यांचे नेतृत्व : एक राजकीय अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला. माझ्या आवडीनिवडीला माझ्या मार्गदर्शिका डॉ.(सौ.) व्ही.पी. रासम मॅडम यांनी तात्काळ सहमती दर्शविली त्यांची प्रेरणा, जिव्हाळा माझ्या कामामध्ये चैतन्य देणारा ठरला. त्यांनी मार्गदर्शन ~~करून असताना माझ्या~~वर कृपाकटाक्ष ठेवला त्याबद्दल त्यांचे प्रथम ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य मानतो. तसेच डॉ.पतंगराव कदम यांनीही त्यांच्यावर एम.फिल. करण्यास तात्काळ सहमती दर्शवून माझ्यावर विश्वास दाखविला याबद्दल त्यांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

कोणतेही विधायक कार्य सहकार्याशिवाय पूर्णत्वास पोहचत नाही. या कामी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.के.कावळेकर सर, डॉ.लक्ष्मीनारायण तारोडी सर, डॉ.अशोक चौसाळकर सर, डॉ.नानिवडेकर, प्रा.सौ.भारती पाटील मॅडम या गुरूवर्यांचे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले हे नमूद करून त्यांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

प्रबंधपूर्तीच्या कामी डॉ.पतंगराव कदम यांचे बंधू डॉ.शिवाजीराव कदम, डॉ.पतंगराव कदम यांच्या पत्नी सौ.विजयमाला कदम, मुलगा विश्वजीत कदम यांनीही माहिती उपलब्ध करून देऊन वेळोवेळी सहकार्य केले. याबद्दल त्यांचे आभार मानतो. तसेच वेळोवेळी आस्थापूर्वक चौकशी करून प्रेरणा देणारे प्रा.दिनकर पाटील, भारती विद्यापीठ परिवारातील सर्व पदाधिकारी, अधिकारी, प्राध्यापक, सेवक, राज्यशास्त्र विभागातील श्री.संभाजी तोरस्कर, श्री.अरूण वणिरे, माझ्यावर जीवापाड प्रेम करणारे शिवाजी विद्यापीठ होस्टेलचे व परिसरातील सर्व मित्र यांचेही सहाय्य लाभले त्याबद्दल सर्वांचा मी ऋणी आहे. मी खूप शिकावे यासाठी प्रेरणा देणारे माझे आई-वडील व बंधू संग्राम व युवराज यांचे आशीर्वाद व प्रेरणा हे माझ्या शब्द सामर्थ्याची अक्षय शिदोरी आहे. या शोध प्रबंधाचे काम अत्यंत तत्परतेने पूर्ण करून

देणारे श्री.मिलिंद भोसले याशिवाय जाणता अजाणता सहाय्यभूत ठरलेल्या अशा सर्व मित्र मंडळींचेही आभार मानतो.

धन्यवाद !

**पाटील विक्रम नारायणराव**